# बहि:शाल शिक्षण मंडळ
# शैक्षणिक वर्ष २०२२-२३

लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक -३ येथे दिनांक ३० नोव्हेंबर २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिशाल शिक्षण मंडळाच्या अंतर्गत बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला मा. प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. प्रमुख व्याख्याते शिवव्याख्याते प्रा. जावेद शेख हे उपस्थित होते छत्रपती ते घटनापती या विषयावर त्यांनी आपले पुष्प गुंफले.

"छत्रपती शिवाजी महाराज हे प्रजादक्ष राजे होते रयतेसाठी त्यांनी सुमारे वर्षांपूर्वी समतेचे राज्य निर्माण करून अतिशय महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यामुळेच शिवाजी महाराजांचे शासन हे सुशासन होते. त्या काळातील जनता शिवाजी महाराजांच्या निर्णयामुळे समाधानी होती. सर्व जाती-धर्माचे लोक एक दिलाने एकत्र राहत होते. शिवाजी महाराज म्हणजे या मातीतले एक आभूषण आहे व असा राजा होणे नाही" असे उद्गार शिवव्याख्याते प्रा. जावेद शेख यांनी काढले महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक येथे आयोजित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत आयोजित डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेमध्ये पहिले पुष्प गुंफतांना ते बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज होत्या.

विचारमंचावर उपप्राचार्य डॉ. कैलास कापडणीस विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. राकेश पाटील उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. मृणाल भारद्वाज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात केलेल्या कार्याची माहिती देतानाच बहि:शाल शिक्षण मंडळाच्या उपक्रमाची व महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहि:शाल मंडळाचे केंद्र कार्यवाह डॉ. प्रकाश शेवाळे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. विद्या सुर्वे यांनी केले. तर आभार प्रा. सिताराम मुरकुटे यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्व. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला**

लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक -३ येथे दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिशाल शिक्षण मंडळाच्या अंतर्गत स्व.

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला मा. प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. प्रमुख व्याख्यात्या मा. मधुरा क्षेमकल्याणी या उपस्थित होत्या. तू तेजस्विनी या विषयावर त्यांनी आपले पुष्प गुंफले.

"विद्यार्थीनींनी आज सर्व क्षेत्रात दैदिप्यमान यश प्राप्त करण्यासाठी तेजस्विनी होणे गरजेचे आहे. प्रत्येक काम अधिक चांगल्या पद्धतीने करून स्वतःवर विश्वास निर्माण केला पाहिजे. आपल्या सवयींमध्ये चांगले बदल केल्यास यश हे आकाशाला गवसणी घातल्याशिवाय राहणार नाही" असे उद्गार मधुरा क्षेमकल्याणी यांनी काढले महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक येथे आयोजित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत आयोजित मा यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेमध्ये पहिले पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज होत्या. तसेच विचारमंचावर उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे, विशाखा समितीप्रमुखं डॉ. आशा पाटील, मराठी विभागप्रमुख प्रा. विद्या सुर्वे उपस्थित होत्या.

अध्यक्षीय भाषणात डॉ. मृणाल भारद्वाज यांनी मुलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व, चांगल्या सवयी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. कोविड नंतरच्या काळात आपण स्वतःमध्ये आता बदल घडवून या काळात झालेले शैक्षणिक व मानसिक नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या क्षमता विकसित होण्यासाठी असे कार्यक्रम महत्वाची भूमिका बजावतात. असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहि:शाल मंडळाचे केंद्र कार्यवाह डॉ. प्रकाश शेवाळे यांनी केले. परिचय मराठी विभागप्रमुख प्रा. विद्या सुर्वे यांनी तर

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती घोलप यांनी केले. तर आभार विशाखा समितीप्रमुख डॉ. आशा पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित

**डॉ. प्रकाश शेवाळे**
**केंद्रकार्यवाह, बहि:शाल शिक्षण मंडळ**